# चांगल्या कामगिरी

सावंतवाडी पोलीस ठाणे नापत्ता रजि. क्र. 09/2022 मधील 18 वर्षे वयाची मुलगी हि दि. 19/05/2022 रोजी 15.30 वा. चे दरम्यान तिची दुचाकी सावंतवाडी गवळी तिठा येथे पार्किंग करुन ठेवून बेपत्ता झालेली होती. ती घरी परत आली नाही म्हणून तिचे वडीलांनी सावंतवाडी पोलीस ठाण्यात ती नापत्ता झाल्याची खबर दिली. त्यासंदर्भात पो.ना./98 काळसेकर यांच्या परिचयाचे श्री. योगेश राणे, मॅनेजर, बँक ऑफ इंडीया माणगाव, ता. कुडाळ यांनी 23.00 वा. फोन करुन माहिती दिली की, सदर मुलीने तिच्या भावास आपण पावलो ट्रॅव्हल्स मधून मुंबई च्या दिशेने प्रवास करीत असून लांजा, रत्नागिरीच्या जवळ असल्याचे कळविले व फोन बंद झाला आहे. त्यानंतर पो.ना./98 काळसेकर यांनी सावंतवाडी येथील खाजगी आरामबसचे तिकिट बुकींग करणारे श्री. विशाल सावंत, रा. सबनिसवाडा, सावंतवाडी यांना संपर्क साधून पावलो ट्रॅव्हल्सच्या गाडया जेवणासाठी कुठे थांबतात याची चौकशी केली असता लांज्याचे पुढे 10 ते 15 किमी अंतरावर शांती हॉटेल जवळ गाड्या जेवणासाठी थांबतात असे सांगितले. त्याप्रमाणे सदर माहिती रत्नागिरी पोलीस नियंत्रण कक्षास कळवून पोलीस पाठविण्याची विनंती केली व श्री. योगेश राणे यांना हेल्पलाईन क्र. 112 यावर फोन करुन माहिती देण्यास कळविले. सदर 112 क्रमांकाच्या कॉलनुसार कुडाळ पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक, श्री. मनोज पाटील यांनी मुलीचे वडील व श्री. योगेश राणे यांना प्रत्यक्ष भेटले तेव्हा पो.ना./98 काळसेकर यांनी त्यांना वरील प्रमाणे हकीगत अवगत केली. सहा. पोलीस निरीक्षक, श्री. मनोज पाटील यांनी रत्नागिरी पोलीस नियंत्रण कक्षास संपर्क करुन सदर मुलीला ताब्यात घेण्याबाबत विनंती केली. त्यानंतर रत्नागिरी ग्रामीण पोलीसांमार्फत मुलीला शांती हॉटेल जवळून ताब्यात घेण्यात आले. रात्री 02.00 वा. चे दरम्यान सदर मुलीला रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात तिचे वडीलांचे ताब्यात सुखरुप देण्यात आलेले आहे.

अशा प्रकारे नापत्ता झालेल्या 18 वर्षीय मुलीची माहिती मिळाल्यापासून 02 तासांत शोध होवून ती सुखरुप पालकांच्या ताब्यात मिळाले.